आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२८ ऑगस्ट २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य शासनाकडून साखर साठा मर्यादेबाबत सूचना जारी /उल्लंघन करणाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत कारवाई होणार

- राज्यात राखीपौर्णिमेचा सण उत्साहात साजरा

- नेपाळमधल्या पूरबळींची संख्या ५४७ वर /३२० भारतीय नागरिक अद्याप बेपत्ता, नेपाळमधे गेलेले नागपूर जिल्ह्यातले ११० नागरिक सुरक्षित

**आणि**

- बुडापेस्ट स्कॉश खुल्या स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज रात्री भारताच्या वेलावन सेंथिलकुमारची हंगेरीच्या बालाझ फार्कसशी लढत

**<><><><><>**

केंद्र शासनाच्या साखर साठा निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने साखर विक्रेते, वितरक आणि मोठ्या ग्राहकांसाठी साठा मर्यादेबाबत सूचना जारी केल्या आहेत. साखर विक्रेते आणि वितरकांना कोणत्याही वेळी किंवा कोणत्याही ठिकाणी चार हजार क्विंटल अर्थात चारशे मेट्रिक टनांपेक्षा जास्त साखरेचा साठा ठेवता येणार नाही. साखर प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांपेक्षा जास्त काळ साठा ठेवायलाही मनाई केली आहे. तर, दरमहा दहा मेट्रिक टनांपेक्षा जास्त साखर वापरणाऱ्या मोठ्या ग्राहकांना पंधरा दिवसांपेक्षा जास्त काळ साठा ठेवता येणार नाही. हे निर्बंध ३० नोव्हेंबरपर्यंत लागू राहणार आहेत

सर्व साखर विक्रेते आणि वितरकांनी अन्नसाठा देखरेख पोर्टलवर तात्काळ नोंदणी करून, सध्याच्या साठ्याची माहिती द्यावी आणि त्यानंतर दर शुक्रवारी ही माहिती अद्ययावत करावी, असे निर्देश शासनानं दिले आहेत. राज्यातले साखर कारखाने, व्यापारी, वितरक आणि मोठे ग्राहक यांच्या साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी कालपासून विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत कारवाई केली जाणार आहे.

<><><><><>

देशभरात राखी पौर्णिमेचा सण पारंपरिक पद्धतीनं साजरा केला जात आहे. रक्षाबंधनाचं औचित्य साधून स्नेहबंध वाढवणारे विविध उपक्रम राबवले जात आहेत. यवतमाळ जिल्ह्यात पुसद इथं माणुसकीची भिंत या उपक्रमांतर्गत नागरिकांनी वृद्धाश्रम आणि उपजिल्हा रुग्णालय इथला परिसर स्वच्छ करुन निराधार, बेघर, वृद्ध व्यक्तींसह रक्षाबंधन साजरं केलं. सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस विभागाने 'एक राखी सुरक्षेची' हा उपक्रम राबवला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना राखीपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. समाज आणि राष्ट्राचे रक्षण करत विकसित भारत घडवण्याचं आवाहन त्यांनी आपल्या संदेशातून केलं आहे. आपलेपणाचे बंध दृढ करणारा राखीपौर्णिमेचा सण सुसंवाद आणि परस्परांचा आदर या मूल्यांची जाणीव करुन देतो. सर्वांना या निमित्तानं सौख्य आणि समृद्धी लाभो अशा शब्दात उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांनीही राखीपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी, राखीपौर्णिमेचा सण सर्वांच्या जीवनात आनंद, समृद्धी आणि यश घेऊन येवो अशा शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह विविध मान्यवरांनी नागरिकांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने देशभरातून सगळे भेदाभेद विसरून विविध लोक एकत्र येतात आणि अशा प्रकारचं सामाजिक अभिसरण जगात इतरत्र कुठेही दिसत नाही, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं. नाशिक इथं सिंहस्थ महाकुंभ भक्तिसंगमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या कुंभमेळ्याचा उद्देश हा केवळ पवित्र नद्यांमध्ये स्नान करणं हा नाही, तर या अनुषंगानं आपल्या परंपरांमधून होणारं मंथन आणि चिंतन हे खरं अमृत आहे, असं ते म्हणाले. या निमित्तानं, गोदावरी नदी निर्मळ व्हावी, अविरल वाहावी, यासाठी सांडपाणी प्रक्रिया करूनच नदीत सोडायच्या प्रकल्पांची सुरुवात केली आहे. त्यामुळे पुढच्या वर्षी कुंभमेळ्यासाठी कोट्यवधी भाविक इथं येतील, तेव्हा एका वेगळ्या गोदावरी नदीचं दर्शन त्यांना घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा, २०२६ आजपासून राज्यात लागू झाला. बळजबरी, फसवणूक किंवा आमिष दाखवून बेकायदा धर्मांतर करायला आळा घालण्यासाठी कठोर तरतुदींचा समावेश या कायद्यात आहे. असं करणाऱ्यांना ७ वर्षांचा तुरुंगवास आणि ५ लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावला जाऊ शकतो. तर गुन्ह्याची पुनरावृत्ती झाल्यास १० वर्षं तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते. स्वेच्छेनं धर्मांतर करायच्या किमान ६० दिवस आधी स्थानिक दंडाधिकाऱ्यांना पूर्वसूचना देणं या कायद्यामुळे बंधनकारक झालं आहे.

**<><><><><>**

नेपाळ आणि तिबेटमध्ये आलेल्या विनाशकारी आकस्मिक पुरामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर झाली असून, मृतांचा आकडा ५४७ वर पोहोचला आहे तर अजून १ हजार ५४५ जण बेपत्ता आहेत. पूरग्रस्त भागातल्या नद्यांचे किनारे आणि दुर्गम वस्त्यांमध्ये सुरक्षा जवानांच्या पथकांकडून शोध आणि बचाव कार्य सुरू आहे.

नैऋत्य चीनमध्ये झालेल्या ५ पूर्णांक १ दशांश रिश्टर स्केलच्या भूकंपामुळे नव्यानं महापुराचा धोका असून प्रशासनानं हाय अलर्ट जारी केला आहे. भोटे कोशी नदी उगमस्थानाजवळ एक नवीन नैसर्गिक तलाव तयार झाला आहे. तिबेटच्या बाजूला एका धरणाला तडे गेल्याचं वृत्त आहे. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनानं पूरग्रस्त जिल्ह्यांमधून ८०० हून अधिक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे.

**<><><><><>**

नेपाळमधे बुधवारी आलेल्या महापुरानंतर अजूनही ३२० भारतीय नागरिक बेपत्ता आहेत. याशिवाय इतर देशांचं नागरिकत्व असलेले १०० भारतीय वंशाचे लोकही सध्या संपर्काबाहेर आहेत, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहरांना सांगितलं. त्रिशुली-१ जलविद्युत प्रकल्पात कार्यरत ६३ भारतीय नागरिकांना सुरक्षा जवानांनी सुखरूप बाहेर काढलं आहे. तसंच चीनच्या हद्दीत अडकलेले आणखी ९६ भारतीय जमिनीच्या मार्गाने सुरक्षितपणे नेपाळमध्ये दाखल झाले असून, त्यांना भारतात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. काल काठमांडू इथं पोहोचलेले तामिळनाडूतले २१ भारतीय आज दुपारी नवी दिल्लीत दाखल झाले, अशी माहिती त्यांनी दिली. चीनमधले सुमारे ४०० भारतीय नागरिक सुरक्षित असून त्यांच्या कुटुंबियांच्या संपर्कात आहेत. भारतीय

दूतावास, स्थानिक प्रशासन आणि ट्रॅव्हल एजंट्सच्या माध्यमातून त्यांच्या सुरक्षित सुटकेसाठी समन्वय साधला जात आहे, असंही जयस्वाल यांनी सांगितलं.

दरम्यान, नेपाळमधे काठमांडू इथं गेलेले नागपूर जिल्ह्यातले ११० नागरिक सुरक्षित असून त्यांच्या परतीच्या प्रवासाची व्यवस्था करण्यात आली आहे.

<><><><><>

हंगेरी इथं सुरू असलेल्या पीएसए बुडापेस्ट स्कॉश ओपन स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताच्या वेलावन सेंथिलकुमारची लढत यजमान हंगेरीच्या बालाझ फार्कसशी होईल. भारतीय प्रमाणवेळेनुसार आज रात्री साडेनऊ वाजता हा सामना होणार आहे. काल रात्री झालेल्या चुरशीच्या उपांत्य सामन्यात वेलावन यानं भारताच्याच वीर चोत्रानीचा ३-२ असा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. तर जागतिक क्रमवारीत ५५ व्या क्रमांकावर असलेला फार्कस याने इजिप्तच्या मुस्तफा अलसिर्तीचा ३-० असा सरळ गेममध्ये पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

<><><><><>

शेतकऱ्याला कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी नव्या तंत्रज्ञानावर आधारित व्यवस्था उभी करावी लागेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. ते आज नाशिक जिल्ह्यात मौजे चाचडगाव इथं एका कार्यक्रमात बोलत होते. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर केला तर उत्पादन खर्च २५ ते ३० टक्क्यापर्यंत कमी करून उत्पादकता ४० टक्क्यापर्यंत वाढवता येईल. यासाठी राज्य सरकारनं 'महाविस्तार ॲप' तयार केलं आहे. याद्वारे शेतकऱ्याला संपूर्ण पीकसाखळीचं मार्गदर्शन मिळू शकेल, असं त्यांनी संगितलं.

<><><><><>

आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा वापर महाराष्ट्रात राहुल गांधीं यांच्या रिलाँचिंगसाठी करण्याचा प्रयत्न काँग्रेस करत असल्याची टीका महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. ते आज नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. काँग्रेसनं हा प्रकार तातडीनं थांबवावा, असं ते म्हणाले.

दरम्यान, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी 5 ऑगस्टला काढलेला शासन निर्णय रद्द करावा, या आणि इतर मागण्यांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यात संगमनेर घुलेवाडी इथल्या आदिवासी शासकीय वसतिगृहासमोर विद्यार्थ्यांनी उघड्यानं आंदोलन सुरू केलं आहे. मागण्या पूर्ण

होईपर्यंत आपण सदरा न घालता आंदोलन करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. तर, नंदुरबार जिल्ह्यात शहादा शहरालगत असलेल्या आदिवासी विकास विभागाच्या तीन वसतीगृहांमधल्या विद्यार्थ्यांनी पाण्याच्या प्रश्नावरुन आंदोलन सुरु केलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पदाच्या पेपरफुटी प्रकरणी मुख्य आरोपी आणि कौटिल्य अकॅडमीचा संचालक प्रवीण पाटील याला आज सकाळी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकानं नंदुरबारात आणलं. त्यानंतर त्याच्या अकादमीत त्याची सुमारे तासभर चौकशी झाली. पाटीलची ई-साक्ष तसंच ओळख परेड झाली. तपासाच्या पुढच्या टप्प्यात घरी तसंच मूळ गावी जाऊन झडती घेतली जाईल, असं सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**